# तत्त्वचिंतक
# महात्मा जोतीराव फुले



- संपादक -

**डॉ. विनोद अवधुतराव कोकणे**

एम.ए., बि.एड., एम.फिल., पीएच.डी., नेट

# तत्वचिंतक महात्मा जोतीराव फुले

**Peer-Reviewed Book Chapter**


■ प्रा.डॉ. विनोद अवधूतराव कोकणे



■ प्रथम आवृत्ती - मार्च २०२०

■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.

हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,

वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती

मो. ९५९५५६०२७८

email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना

विलास पवार

सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी

सरिता ग्राफिक्स,

कठोरा रोड, अमरावती

■ मुद्रक

आधार पब्लिकेशन अमरावती

■ Price : २००/-

ISBN-978-93-89478-38-9

# अनुक्रमणिका

१) महात्मा फुलेंची शैक्षणिक क्रांती / 1
प्रा.कु.सपना मानखैर
२) म. फुलेंचे शैक्षणिक विचार /१२
प्रा. डॉ. रश्मी बंड
३) समाजसुधारक महात्मा ज्योतीराव फुले यांचे विचार /१८
प्रा. डॉ. किशोर यादवराव ठाकरे
४) महात्मा फुले : विचार व कार्य २७
प्रा. दिलीप घोनमोडे
५) महात्मा जोतीराव फुले यांचे शैक्षणिक विचार /३४
प्रा. सुधीर नारायणराव देशमुख.
६) महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार ४३
प्रा.रश्मी टेकाडे
७ )महात्मा ज्योतीबा फुले यांचे सामाजिक विचार /५०
प्रा.सिध्दार्थ पाटिल
८) महात्मा जोतिबा फुले यांचा शोषित वंचितांबाबतचा जागतिक दृष्टीकोन/५७
डॉ. अनिल सी. बनकर
९) स्त्री मुक्ती संदर्भात जोतीबा फुलेचे मुलगामी विचार /६३
प्रा.विनोद मारोतराव बळी
१०) महात्मा फुलेंची जाती निर्मुलनाची चळवळ/७३
प्रा. प्रदिप गजभिये
११) महात्मा फुले यांचे शैक्षणिक व स्त्रीवादी विचार /७७
१२) महात्मा फुले यांचे शैक्षणिक व स्त्रीवादी विचार /७७
डॉ.प्रा.सौ.विशाखा वंजारी

१३) म. फुले यांचे सामाजिक विचारः एक आकलन / ९०
प्रा. डॉ. विनोद यू भालेराव
१४) महात्मा फुले यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्ये / १०१
डॉ. डी.एम. कदम
१५) भारतीय संविधान - एक मानवाधिकाराचा पवित्र ग्रंथ / १०६
प्रा. निरजकुमार दे. अंभोरे
१६) Mahatma Jyotiba Phule : A Global Philosopher And The Architect Of Modern India
Prof. Hemesh Nandkishor Joshi / 110
१७) महात्मा फुलेंचा शेतकऱ्यांच्या संदर्भातील दृष्टीकोन
डॉ. निलिमा. वाय. भोगे / 117

# महात्मा फुलेंचा शेतकऱ्यांच्या संदर्भातील दृष्टीकोन

डॉ. निलिमा. वाय. भोगे

हजारो वर्षाच्या भारतीय इतिहासात मुलींकरिता शाळा स्थापण करणारे पहिले भारतीय म्हणून, भारतीय स्त्री शिक्षणाचे जनक, शेतकरी नि कामकरी यांच्या दुःखाचे नि दारिद्रयाचे निवारण करण्यासाठी चळवळ उभारणारे पहिले भारतीय नेते आणि चातुवर्ण्य व जातीभेद या संस्थावर कडाडून हल्ला चढवून मानवी समानता निर्माण करण्यासाठी लढणारे पहिले लढवय्ये लोकनेते होते. आधुनिक भारताचे ते पहिले महात्मा आणि सत्यशोधक होते. भारतीय समाजकांतीचे जनक आणि 'भारतातील सामान्य जनतेच्या नवयुगाचा प्रेशित'

महात्मा ज्योतिबा फुल्यांनी भारतीय समाजव्यवस्थेचा परिपूर्ण अभ्यास करून अनेक विषयांना / समस्यांना त्यांनी स्पर्श केला व खऱ्या अर्थाने समताभिमूख समाज निर्माण करण्यासाठी अनेक चळवळी उभ्या केल्या डयुट ऑफ कनॉट यांच्या सत्काराप्रसंगी त्यांनी केलेले भाषण संस्मरणीय आहे. "आपल्या समोर रेशमी कपडे नि अलंकार परिधान केलेले श्रीमंत, सरदार नि जहागिरदार पाहून रयतेविषयी आपण मत बनवू नये. खरा भारत पहावयाचा असेल, तर मजबरोबर खेडयात चला", असे त्यांनी युवराजांना स्पष्टपणे सांगीतले.

ब्रिटिश राजसत्तेबरोबर भारतात आलेले नवे ज्ञान बुध्दीवाद, यंत्रयुग आणि विज्ञान यांच्या प्रकाशात ब्राम्हणी धर्माची, जुन्या पोथ्यापुराणांची, जुन्या धर्मग्रंथाची आणि त्यांनी घडविलेल्या सामाजिक मुल्यांची परिक्षा करण्यासाठी एकोनिसाव्या शतकाच्या मध्यास जे विचारवंत पुढे सरसावले त्यांत ज्योतिरावांना अग्रमान देणे कमप्राप्तच आहे. टॉमस पेन या महान बंडखोर विचारवंताच्या 'मानवाचे हक्क' (Rights of Man) या ग्रंथाचा फार मोठा परिणाम ज्योतीरावांच्या मनावर विद्यार्थीदशेतच झाला आणि त्यातून त्यांच्या जिवितकार्याची दिशाच ठरल्यासारखी झाली. त्यांनी आपले सर्व जीवन मानवी स्वातंत्र्यासाठी समर्पीत केले. त्यासाठी अविरत त्याग केला. लोकक्षोभाला जुमानले नाही, संकटांना धैर्याने तोंड दिले, अक्षरक्षः दिव्य केले. समाजान शब्दप्रामान्य, जुने आचार विचार, जुन्या रूढी, कर्मकांड, जपजाप्य, पुर्वसंचित, पुर्वजन्म, ईश्वरी संकेत, स्वर्ग–नरक इत्यादी कल्पना प्रस्तृत

करणाऱ्या आणि मानवी कर्तृत्व दास्यशृखंलात बध्द करून टाकणाऱ्या माझ्या समजूतीवर ज्योतीरावांना सतत आघात करावे लागत होते. थंड गोडयासारखा पडलेला बहुजन समाज जोवर हालत नव्हता तोवर त्यांना पुन्हा पुन्हा कंठरवाने तेच तेच सांगावे लागत होते. शती ती पदे नित्य फिरून येती ! त्या त्याच अर्थाप्रती दावितातीश हे हाडाच्या प्रचारकाला चुकत नाही. ज्योतीरावांच्या वाङःमयातील पुनरूक्तीचे हे एक मर्म ध्यानात ठेवावयास पाहीजे.

महात्मा ज्योतीबा फुल्यांना शेतकऱ्यांविषयी फार मोठी आस्था होती, त्यांचे होणाऱ्या शोषनांनी ते सारखे व्यस्थित असायचे म्हणून त्यांनी 'शेतकऱ्यांच्या असूड' हा ग्रंथ लिहून त्यामध्ये शेतकऱ्यांची अवस्था, त्यांची होणारी फसवणूक व ते थांबण्याकरिता उपाय योजना देखील सुचविल्या ते म्हणतात अक्षरशुन्य शेतकऱ्यास भटब्राम्हण धर्म मिमांषाने इतके नाडवितात की, त्याजविषयी या जगात दुसरा कोठे या मासल्याचा पडोसा सापडणे फार कठीण, पुर्वीच्या धूर्त आर्यब्राम्हण ग्रंथकारांनी आपले मतलबी धर्मांचे लिगाड शेतकऱ्यांच्या मागे इतके सफाईने लावले की, शेतकरी जन्मास येण्याचे पूर्वीच त्याचे आईस ज्यावेळेस ऋतू प्राप्त होतो तेंव्हा तिच्या गर्भाधनादि संस्कारा पासून तो हा मरेपर्यन्त कित्येक गोष्टिनी लुटला जातो. इतकेच नव्हे तर हा मेला तरी त्याच्या मुलास श्राध्द वैगरेच्या मिशाने धर्माचे ओझे सोसावे लागते. कारण शेतकऱ्यांचे स्त्रियास ऋतू प्राप्त होताच भटब्राम्हण जपानुष्ठान व तत्संबंधी ब्राम्हणभोजनाचे निमित्याने त्यापासून द्रव्य हरण करतात व सदरची ग्राम्हणभोजन घेतेवेळी भटब्राम्हण आपले आप्तसोयरे व इष्टमित्रासह तुपपोळयांची व दक्षिणेची इतकी धांदल उडविली की, त्यांच्या उरल्या सुरल्या अन्नापैकी त्या बिचा–या अज्ञास शेतकऱ्यांस पोटभर आमटीपोळी मिळण्याची सुध्दा मारामार पडते.

पिढीजात अज्ञानी शेतकऱ्यांची द्रव्याची व वेळेची भटब्राम्हणांकडून इतकी हानी होते की, त्यांना आपली लहान मुलेसुध्दा शाळेत पाठविण्याचे त्रास उरत नाही व याशिवाय आर्यभटऋशींनी फार पुरातन काळापासून शुद्र शेतकऱ्यांस ज्ञान देऊ नये म्हणून सुरू केलेल्या वहिवाटीची अज्ञानी शेतकऱ्याचे मनावर जशीच्या तशीच धास्ती असल्यामुळे त्यांना आपली मुले शाळेत पाठविण्याचा इच्छा होत नाही आणि हल्लीचे आमचे दयाळू गव्हर्नर जनरल साहेबांनी पाताळाचे अमेरिकन लोकसत्तात्मक राज्यातील महाप्रतापी जॉर्ज वाशिग्टंन ताताचा कित्ता घेऊन येथील ब्राम्हण सांगतील तो धर्म आणि इंग्रज करतील ते कायदे मानणाऱ्या अज्ञानी शुद्रादि

अतिशुद्रास विव्दान भट्ब्राम्हणांप्रमाणेच म्युनिसिपालिटीत आपले वतीने मुख्त्यार निवडून देण्याचा अधिकार दिला आहे खरा, परंतू या प्रकरणात भटब्राम्हण आपले विद्याचे मतांद सोवळया ओवडयाच्या तोऱ्यांनी अज्ञानी शुद्रादि अतिशुद्र लोंकाशी छक्केपंजे करून त्यांना पुढे ढकलू लागल्यास आमचे दयाळू गव्हर्नर जनरल साहेबांचे माथ्यावर कादाचित अपयशाचे खापर व फुटो म्हणजे भटब्राम्हणांचे गंगेत घोडे नाहले, असे आम्ही समजू.

शेतकऱ्याची अनेक प्रकारे लुट केली जाते वेगवेगळया प्रकारे त्यांना नाडविल्या जाते ज्योतीराव म्हणतात, कित्येक ब्राम्हण व मारवाडी, सावकार नापतीच्या अक्षरशुन्य शेतकऱ्यास सांगतात की, सरकारी कायद्यामुळे तुम्हाला गहाणावर खर्जाऊ रूपये आम्हास देता येत नाहीत. यास्तव तुम्ही जर आपली शेते आम्हास खरेदी करून द्याल, तर आम्ही तुम्हास कर्ज देऊ व तुम्ही आमचे रूपयाची फेड केल्याबरोबर आम्ही तुमचे शेते परत खरेदी करून तुमच्या ताब्यात देऊ म्हणून शपथा घेऊन बोल्या मात्र करतात परंतु या सोवळया व अहिंसक सावकारापासून कूंटुबवत्सल अज्ञानी भोळया शेतकऱ्यांची शेते क्वचितच परत मिळतात. याशिवाय हे अट्टल धर्मशिल, सावकार, अक्षरशुन्य शेतकऱ्यास,, शेतकऱ्यांवर नाना तऱ्हेच्या बनावट जमाखर्चाच्या वहयासहीत रोख्यांचे पुरावे देऊन त्यांची लुबाडणूक करतात. कित्येक कर्मिष्ठ ब्राम्हणकामगार आपल्या जातितील पुराणीकाल्ला व कथेकऱ्यांला कित्येक अज्ञानी सधन शेतकऱ्यापासून देणग्या देववितात. कित्येक धोरणी धुर्त अज्ञानी भोळया सधन शेतकऱ्यास गाठून त्यांजपासून राधाकृष्णांची नवा देवळे गावोगावी बांधवून काही जुन्या देवळाचा जीणोव्दार करवितात व त्याजकडून उधापणाचे निमित्ताने मोठमोठाली ब्राम्हणभोजणे काढतात. कित्येक धुर्त कामगार यूरोपियन कामगाराच्या नजरा चुकवून एकंदर सर्व अज्ञानी शेतकऱ्यास नाना प्रकारे त्रास देतात व त्याबद्दल शेतकरी लोक आंतले आंत त्यांचे नावाने खडे फोडीत असतात.

आर्य ब्राम्हण इराणांतून कसे आले व शुद्र शेंतकरी त्यांची मुळ पिठिका व त्यावेळेस सरकार एकंदर सर्व आपले कामागारास मन मोनल तसे पगार व पेन्शने देण्याचे इराध्याने नानाप्रकारे नित्य नवे कर शेतकऱ्यांचे बोडक्यावर बसवून, त्यांचे द्रव्य मोठया हिकमतीने गोळा करू लागल्यामुळे शेतकरी अट्टल कर्जबाजारी झाले आहेत.

रात्रंदिवस शेतीत खपणाऱ्या कष्टाळू शेतकऱ्यांच्या शेतावर दर तीस वर्षानी, पाहीजे तसे शेतसारे वाढवून त्यांच्या अज्ञानी मुलाबाळास विद्या देण्याची हुल दाखवून, त्या सर्वांच्या बोडक्यावर 'लोकलफंड' या

नावाचा दुसरा एक कराचा बोजा लादला आणि त्यांनी शेतकऱ्यांनी आपल्या मुलांबाळासह रात्रंदिवस शेतात खपून धान्य, कापूस, अफु, जवस वैगरे काला कित्ता मोठया कष्टाने कमावून शेतकऱ्यांना सुध्दा लोकलफडाचे हप्ते अदा करण्याकरीता त्या सर्व जिनसांस बाजारात नेऊन दान करावयास जाण्याचे राजमार्गात दर सहा मैलावर जागोजागी जकाती बसवून त्यांच्यापासून लाखो रूपये गोळा करू लागले. जे आपल्या विपत्तीत आसपासच्या जंगलातील गवत, लाकूडफाटा व पानफुलांवर गुराढोरांची व आपली जपणूक करित असत ती सर्व जंगले सरकारणे आपल्या घशात घातली त्यांच्या कोंड्याभोड्याच्या भाकरीबरोबर तोंडी लावण्याच्या मिळावरसुध्दा भली मोठी जकात बसविली तसेच शेतकऱ्यांच्या शेतात भरपूर पाणी असल्याने त्यांच्या जितराबाचा बचाव होऊन त्यास पोटभर भाकर व अंगभर वस्त्र मिळावे असा वरपांगी भाव दाखवून आतून आपल्या देशबांधव युरोपियन इंजिनियर कामगारास मोठमोठे पगार देण्याच्या इराधाने युरोपातील सावकारास महामूर व्याज देण्याचा हेतू मनी धरून त्यांचे कर्ज भारताच्या बोडक्यावर वाढवून त्या कर्जापैकी लक्षावधी रूपये खर्ची घलून जागोजागी कालवे बांधले आहेत. व त्या कालव्यातील पाण्याची किंमत अज्ञानी शेतकऱ्यांपासून मन मानेल तशी घेऊन, त्यांच्या शेतात वेळेच्या वेळी तरी पाणी देण्याविषयी सरकारी कामागाराकडून बरोबर तजविज ठेवली जाते काय? कारण या इरिगेशन खात्यावरील बेपर्वा युरोपीयन इंजिनियर आपली सर्व कामे ब्राम्हण कामगारावर सोपवून आपण वाळयाच्या पडधाचे आत बेगमसाहेबासारखे ऐषआरामात मर्जीप्रमाणे कामे करित बसतात.

अनेक गावातील शेतकरी दरवर्षी शेतसारा भरण्यापूरते कर्ज ब्राम्हण, सावकारापासून काढून त्यास मळा गहाण करून देऊन, रजिस्टर करून देतात पुढे सावकारांने मन मानेल तसे मुद्दल कर्जावरील व्याजाचे कच्यांचे बच्चे करून त्यांचा बारवेचा मुळा आपल्या घशात घातला व त्यांच्या कामगार नातेवाईकांकडून रितसर कागदपत्र तयार करून शेतकऱ्यांना त्यांच्या शेतातून हदपार केले. आता तर त्यांची अशी दयनिय अवस्था केली की, उरलेल्या शेताचा शेतसारा द्यावा कोठून? बागाईतात नविन मोटा विकत घेण्याकरीता जवळ पैसा नाही. जुन्या तर अगदी फाटून त्याची चाळण झाली आहे त्यामुळे उसाचे बाळगे मोडून हुंडिचीही तिच अवस्था झाली आहे. मका ही खुरपणी वाचून वाया गेली, भुस सरून बरेच दिवस झाले आणि सरभड गवत, कडब्यांच्या गंजी संपत आल्या आहेत, जनावरांना पोटभर चारा मिळत नसल्यामुळे कित्येक धट्टेकट्टे

बैल उठवणीस आले आहेत. सुनाबाळाची नेसण्याची लुगडी फाटून चिंध्या झाल्यामूळे लग्नात घेतलेली मौल्यवान जून पांघरूने वापरून त्या दिवस काढीत आहेत, शेती खपणारी मुले वस्त्रावाचून इतकी उघडीबंब झाली आहेत की, त्यांना चारचौघात येण्यास शरम वाटते. घरातील धान्य सरत आल्यामुळे रताळाच्या वरूवर निर्वाह चालू आहे.. घरात माझ्या जन्म देणाऱ्या आईच्या मरतेवेळी तिला चांगले चुंगले गोडधोड करूण घाउ घालण्यापूरता मजजवळ पैसा नाही. याला उपाय तरी मी काय करावा बैल विकून जर शेतसारा द्यावा तर पुढे शेतकी कोणाच्या जोरावर ओढावी? व्यापारधंदा करावा तर मला लिहीता, वाचता मुडीच येत नाही, आपला देश त्याग करून जर परदेशात जावे, तर मला पोट भरण्यापूरता काही हुन्नर ठाऊक नाही. कन्हेरीच्या मुळया मी वाटून प्याल्यास कर्तीधर्ती मुले आपली कशीतरी पोटे भरतील. परंतू माया जुन्म देणाऱ्यां वृध्द बयेस व बायोसह माझ्या लहानसहान चिटूकल्या लेकरास अशा वेळी कोण सांभाळील? त्यांनी कोणाच्या दारांत उभे राहावे? त्यांनी कोणापाशी आपले तोंड पसरावे?

कर्ज बाजारी शेतकऱ्यास ब्राम्हण अथवा मारवाडी सावकारांनी त्यांचे मुलाचे लग्नाकरीता कर्ज न दिल्यास कित्येक मुले भर ज्वानीत आल्याबरोबर त्यापैकी कित्येक तरूण निराळया मार्गाने मदाग्नि शांत करू लागल्यामुळे त्यांस क्षमाचा बाधा होऊन वाया जातात, कित्येक तरूण निःसंग होऊन चोरी छापीचे काडीमहलातही खाटल्यावर जाऊन खडपटी करू लागल्यामूळे थोडयाच दिवसांत ते मृत्यू पावतात व बाकी उरलेली चोर, बंडखोरांचे नादी लागून आपल्या जीवास मुकतात.

अशा रितीने महात्मा फुल्यांनी तत्कालीन समाजव्यवस्थेतील शेतकऱ्यांची जीवनगाथा रेखाटली जी संपूर्ण अंधश्रध्दने बरबटलेली, शोषण करणारी, मानवता विरहीत अनेक मापंदडांनी मुक्त माणसाला अंधाराच्या खाईत लोटणारी दिसून येते. याच मुठभर लोंकाकरिता ती फायदयाची दिसून येते. याच मुठभर लोंकानी अनेक देवदेवता, कर्मकांड, अंधश्रध्दा समाजात पसरवून त्यांनी ही दयनिय अवस्था निर्माण केलेली दिसून येते.

महात्मा फुल्यांनी शेतकऱ्यांची ही स्थिती पाहून काही उपाययोजना केल्या त्याचा पुढीलप्रमाणे विचार करता येतो.

भारतातील गोऱ्या लोंकानी मुसलमानांनी गायबैलासह त्याची वासरे कापून खाण्याचे ऐवजी, त्यांनी येथील शेळया बकरी मारून खावीत अथवा परमूलखातील गायबैल वैगरे खरेदी करून येथे आणून मारुन खावे, म्हणून कायदा करून अमलांत आणल्याशिवाय, येथील शुद्र

शेतकऱ्यांजवळ बैलाचा पुरवठा होऊन त्यांना आपल्या शेतीची मशागत करता येणार नाही व त्यांच्या जवळ शेणखताचा पुरवठा होऊन त्यांचा व सरकारचा फायदा होणे नाही.

दयाळू सरकारने एंकदर सर्व डोंगरटेकडया मधील दऱ्याखोऱ्यांनी तलावतळी, जितकी होतील तितकी सोयीसोयीने बांधून काढावीत, म्हणजे त्यांच्या खालच्या प्रदेशात ओढयाखोढयांनी भर उन्हाळयात पाणी असल्यामुळे जागोजागी लहान मोठी धरणे चालून एकंदर सर्व विहीरीस पाण्याचा पुरवठा होऊन त्यापासून सर्व ठिकाणी बागायती होऊन शेतकऱ्यांचा फायदा होणार आहे. सर्व नदीनाले व तलावातील सांचलेला गाळ पूर्वीप्रमाणे शेतकऱ्यास फुकट नेऊ द्यावा, शेतकऱ्यांच्या शेताचे रानडूकरे वैगरे जनावरांनी खाऊन नुकसान केल्यास ते सर्व नूकसान पोलीस खात्याकडील वरिष्ठ अंमलदाराच्या पगारातून कापून अथवा सरकारी खजिन्यातून शेतकऱ्यास भरूण देण्याविषयी कायदा केल्याशिवाय, शेतकऱ्यास रात्री पोटभर झोपा मिळून त्यास दिवसा आपल्या शेती भरपूर उद्योग करण्याची सवड होणे नाही. याचेच नाव 'मला होईना आणि तुझे साहिना'! सरकारणी जमा केलेल्या लोकल फंडामध्ये शेतकऱ्यांच्या मुलास शिक्षण देण्याकरीता तरतूद असावी.

वरीलप्रमाणे सरकारने उपाययोजना अमलांत आणल्यास शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल.

महात्मा फुल्यांनी तत्कालीन शेतीव्यवस्थेचे भीषण चित्रण केले यावरून आपणास असे दिसून येते की, शेकडो वर्षापासूनची शेतकऱ्यांची दयनिय अवस्था आहे व त्यांची वेगवेगळया मार्गांनी लुबाडणूक होतांना दिसत आहे. लुबाडणूक करणारी व्यवस्था, व्यक्ती वेगवेगळी रुपे धारण करून शेतकऱ्यांना सातत्याने कर्जाच्या विळख्यात ओढतात. त्यांना अनेक प्रकारची आमिषे दाखवून त्यांच्या जमीनी गारद करतांना दिसतात शेकडो वर्षापासून आमचे मायबाप सरकार अजूनही योग्य रितिने उपाययोजना करु शकले नाही. उलट उपाय योजनांच्या नावावर अनेक मोठमोठे घोटाळे करुन सरकारातील काही प्रतिनिधी व शासकीय कर्मचारी गब्बर झालेली दिसून येतात. आजही शेतकरी कर्जाच्या विळख्यात दिसून येतो नापीकी, निसर्गाची अनियमितता, बाजारभाव, दोषपूर्ण शासकीय यंत्रणा, सावकार यांच्या जाचाला कंटाळून शेतकरी आत्महत्या करीत आहेत.

## संदर्भ :–


संदर्भ :–

| | |
|---|---|
| किर धनंजय, मालशे,, स. गं. आणि फडके य. दी. | 'महात्मा फुले समग्र वाङ्मय' महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई 24, 28, 30, 217, 77, 85, 301, 08, 16. |
| वानखडे चंद्रकांत | 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या' परिसर प्रकाशन अंबेजोगाई |
| ब्रम्हे सुलभा | 'शेतकरी जात्यांत' धनंजयराव गाडगीळ जन्मशताब्दी प्रबोधनमाला – 20. |
| तिजारे बाबा | 'सामुदायीक आणि विस्तार शिक्षण'- महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मीती मंडळ, औरंगपूरा, औरंगाबाद. |
| देसाई स.श्री.मु. भालेराव निर्मल | 'भारतीय अर्थव्यवस्था' निराली प्रकाशन बुधवार पेठ, पुणे |
| नाडगोंडे गुरुनाथ | 'ग्रामीण समाजशास्त्र' कान्टिनेन्टल प्रकाशन विजयानगर, पुणे–30 |
| | नविन शेतकी धोरणांचा पंचनामा प्रकाशक – प्रभाकर संझगिरी सचिव, महाराष्ट्र राज्य समिती मार्क्सवादी कम्यूनिष्ठ पक्ष, जनशक्ती पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई 30/12/2000. |



सहयोगी प्राध्यापक कला,
विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा.




नाव : **प्रा. डॉ. विनोद अवधूतराव कोकणे**

जन्मतारीख : ०९/०१/१९७४

शिक्षण : एम.ए.(मराठी), एम.ए. (राज्यशास्त्र), एम.फिल.(मराठी), पीएच.डी.(मराठी), बी.एड., बी.पीएड, नेट -जून १९९९, नेट - डिसेंबर १९९९

व्यवसाय : सहा. प्राध्यापक, पदव्युत्तर मराठी विभाग, जे.डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय, दर्यापूर, जि.अमरावती.

अध्यापन कार्य : पदवी स्तर १८ वर्षे, पदव्युत्तर विभाग १८ वर्ष, महाविद्यालयीन स्तर: राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी ६ वर्ष.

पुरस्कार : राजीव गांधी नॅशनल फेलोशिप अवार्ड, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली. (२ लाख रूपये) जून २००९

: जिल्हा संघटक, मागासवर्गीय प्रा. संघटना, अमरावती.

: सदस्य, लॉर्ड बुद्धा, टि.व्ही. चॅनल, अमरावती.

: सदस्य, संशोधन समिती, जनसाहित्य परिषद, अमरावती.

संशोधन पत्रिका : इंटरनॅशनल-

१) दलित आत्मकथनातील समाजवास्तव एक दृष्टीकोन

२) आदिवासी वारली जमात : समाज आणि संस्कृती

३) भूदान चळवळीचे प्रणेते : आचार्य विनोबा भावे.

४) 'महानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी व दलित जाणिवा'

पीएच.डी.(मराठी) : फेब्रुवारी २०१२, संत गाडगेबाबा, अमरावती विद्यापीठ, अमरावती.

लघु शोध प्रकल्प : Minor Research Project

मराठी दलित आत्मकथनातून झालेले समाज प्रबोधन

(UGC New Delhi, Rs. 45000/- submitted)

Major Research Project : 'दलित आत्मकथनातून स्त्री जीवन जाणिवांची चिकित्सा.' (प्रस्तावित)

पत्रव्यवहाराचा पत्ता : ३८, नंदनवन कॉलनी, व्ही.एम.व्ही. पोस्ट ऑफीस, नवोदय विद्यालय, मागे, अमरावती.

ई-मेल : vkokane9@gmail.com

भ्रमणध्वनी : ९५२७०५००३९



**Aadhar Publication**

New Hanuman Nagar, Infront of Pathyapustak Mandal, VMV Road, Amravati - 444604

Email - aadharpublication@gmail.com, M : 9595560278

ISBN : 978-93-89478-38-9

978-93-89478-38-9